# सातारा जिल्हा परिषद,सातारा
## पशुसंवर्धन विभाग

**कार्यालयाचा पत्ता :- जिल्हा परिषद मुख्य इमारत, 3 रा मजला,सातारा-कोरेगांव रोड, सातारा-** 415 001
**कार्यालय दूरध्वनी क्र.**02162 299791 Email-dahosatara@gmail.com


जावक क्र.साजिप/पशुसं/तंत्र/579 /2023. दिनांक:-30/06 /2023.

प्रति,

-----------------------------------------

**विषय:- जि.प.सेस सन** 2023-24 **अंतर्गत वैयक्तीक लाभांच्या योजनांना वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देणे बाबत.**

**संदर्भ:**- मा.अति.मु.का.अ. यांचेकडील मान्य टिपणी दि. /06/2023.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये,पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सातारा अंतर्गत सन 2023-24 करीता जि.प.सेस अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजना राबविणेत योणार आहेत. **दि.**31 **जुलै** 2023 **अखेरपर्यत** सोबत जोडलेल्या योजनांचे अर्ज सादर करावयाचे आहेत.

तरी सोबत जाहिरातीचा नमूना जोडल्याप्रमाणे आपल्या वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी . तसेच जाहिरात दिल्यानंतर रक्कम रू.5000/- चे मर्यादेत देयक (बिल) या कार्यालयास सादर करावे.

सोबत-1.जाहिरातीचा नमूना
2. अर्जाचा नमूना

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद.सातारा

# जाहीर अवाहन

## पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सातारा

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सातारा मार्फत जाहीर अवाहन करणेत येते की, जि.प.सेस सन 2023-24 अंतर्गत वैयक्तीक लाभांच्या विविध **योजना राबविणेत येणार आहेत.**

**योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करण्याचा कालावधी** 31 **जुलै** 2023 **अखेर असून या कालावधीत विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक पशुपालकांसाठी नजिकच्या पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी**-1/2 **तसेच जि.प. संकेतस्थळावर अर्जा चा नमूना उपलब्ध आहे.**

**विहित नमून्यातील अर्ज व इतर संबधित कागदपत्रे नजिकच्या पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी**-1 /2 **या ठिकाणी येथे जमा करावेत.**

**जि.प.सेस सन** 2023-24 **अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना व योजनेचे स्वरूप**

| | |
|---|---|
| 1)**मिल्कींग मशीन पुरवठा करणे** | लाभार्थीनी विहीत मापदंडाची मिल्कींग मशीन खुल्या बाजारातुन स्वपसंतीने खरेदी करुन पावती व अनुषंगिक कागदपत्राची पुर्तता केलेनंतर थेट लाभ हस्तांतरण पध्दतीने 50 टक्के अनुदान रक्कम बँक खात्यावर वर्ग करणेत येते. |
| 2)**कामधेनु आधार योजना**- 01 **दुधाळ जनावर वाटप करणे** | सदर योजना 50 टक्के अनुदानावर राबविणेत येते. विधवा, परितक्त्या, शेतमजूर, भुमिहीन, अत्यल्प व अल्प भुधारक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व निराधार महिलांना 01 दुधाळ म्हैस किंवा संकरित/देशी गाय वाटप करणेत येते. |
| 3) **सर्वसाधारण लाभार्थीस शेळी गट वाटप करणे** | 50 टक्के अनुदानावर सर्वसाधारण लाभार्थींना 05 शेळ्या व 01 बोकड असा शेळी गट वाटप करणेत येतो.सदर गअ खरेदी समिती मार्फत करण्यात येवून अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरण पध्दतीव्दारे जमा करण्यात येईल. |

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद, सातारा